खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### सहकार वक्तृत्व स्पर्धा - आयोजन मराठी विभाग

लोकमत

## खेडमध्ये वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात गुरूवार दि. १६ रोजी स. १० ता. जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राज्य सहकारी संघाचे संचालक हिरामण सातकर यांनी दिली.

वरिष्ठ महाविद्यालयीन गटात ही स्पर्धा भरवली जाणार आहे. सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास, सहकारातून रोजगार निर्मिती, सहकारी चळवळीत युवक / युवतींचा सहभाग, सहकार व खासगी क्षेत्र, सहकारातून नवभारताची निर्मिती आणि सहकारातून समृद्धी असे विषय स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत. स्पर्धेत सहभागी स्पर्धकाला दहा मिनिटांचा वेळ असून विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व करंडक देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयातील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे आणि स्पर्धेपूर्वी नावनोंदणी व अधिक माहितीसाठी राजगुरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अशोक केदारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन हिरामण सातकर यांनी केले आहे.

Hello Pune Gramin
Page No. 10 Oct 15, 2025
Powered by: erelego.com

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**राजगुरुनगर :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात गुरुवार (दि.१६) रोजी सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राज्य सहकारी संघाचे संचालक हिरामण सातकर यांनी दिली. वरिष्ठ महाविद्यालयीन गटात ही स्पर्धा भरवली जाणार आहे. सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास, सहकारातून रोजगार निर्मिती, सहकारी चळवळीत युवक, युवतींचा सहभाग, सहकार व खासगी क्षेत्र, सहकारातून नवभारताची निर्मिती आणि सहकारातून समृद्धी असे विषय स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत. स्पर्धेत सहभागी स्पर्धकाला दहा मिनिटांचा वेळ असून, विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व करंडक देण्यात येणार आहे.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत साक्षी शिवेकर प्रथम



**राजगुरूनगर :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन (दि. १६) करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक साक्षी शिवेकर हिने पटकावला. या वेळी तिचा गौरव करण्यात आला. तर द्वितीय क्रमांक दिव्या पिंगळे हिचा आला. तिला रोख हजार रुपये सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सहकार प्रशिक्षण केंद्राचे निवृत्त प्राचार्य प्रकाश पवार, खरेदी विक्री संघाचे संचालक दत्तात्रेय सातपुते, जिल्हा सहकारी विकास अधिकारी अशोक केदारी, विलास लिंबळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. दिलीप मुळूक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार विलास लिंबळे यांनी मानले.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत साक्षी शिवेकर प्रथम

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक साक्षी शिवेकर (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय) हिने पटकावला. रोख १५०० रूपये, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन तिचा गौरव करण्यात आला. तर द्वितीय क्रमांक दिव्या पिंगळे हिचा आला. तिला रोख १००० रूपये सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सहकार प्रशिक्षण केंद्राचे निवृत्त प्राचार्य प्रकाश पवार, खरेदी विक्री संघाचे संचालक दत्तात्रेय सातपुते, जिल्हा सहकारी विकास अधिकारी अशोक केदारी, विलास लिंबळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. दिलीप मुळूक उपस्थित होते.



यावेळी अशोक केदारी म्हणाले, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सहकार चळवळीविषयी जाणीव-जागृती व्हावी या उद्देशाने या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम आलेल्या साक्षी शिवेकर हिला महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या वतीने पुढील महिन्यात पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार आहे. या स्पर्धेचे आयोजन करण्यात महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक हिरामण सातकर आणि स्व. आप्पासाहेब सातकर प्रतिष्ठाने सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार विलास लिंबळे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख